**ठळक बातम्या**

- विकसित भारताचं लक्ष्य साध्य करण्यासाठी सुधारणांची गती वाढवण्याचं प्रधानमंत्र्यांचं देशवासियांना आवाहन, सात क्षेत्रांवर लक्ष केंद्रीत करुन सर्वंकष विकास करणार

- विद्यार्थ्यांना मोफत ऑनलाइन कोचिंग दिलं जाणार, ५ ते १५ वयोगटातले खेळाडू हेरण्यासाठी विशेष अभियान

- इंडोनेशियात झालेल्या भूकंपात ४० जणांचा मृत्यू

- इस्त्राइलनं लेबननवर केलेल्या हवाई हल्ल्यात ११ जण ठार, १९ जण जखमी

**आणि**

- हॉकी विश्वचषक स्पर्धेतल्या पहिल्या सामन्यात भारताकडून वेल्सचा ३ - १ नं पराभव

**<><><><><>**

विकसित भारताचं लक्ष्य साध्य करण्यासाठी सुधारणांची गती वाढवण्याचं आणि बदल स्वीकारण्याचं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज देशवासियांना केलं. नवी दिल्लीतल्या ऐतिहासिक लाल किल्ल्यावर प्रधानमंत्र्यांच्या हस्ते ध्वजारोहण झालं. त्यानंतर ते बोलत होते. याविषयी सविस्तर जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून.

**होल्ड कॅप्सूल**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज लाल किल्ल्यावरुन सलग १३ व्या वेळी ध्वजारोहण झालं. ध्वजारोहणाच्या पूर्वी वंदे मातरम आणि ध्वजारोहणाच्यानंतर राष्ट्रगीताचं गायन उपस्थितांनी केलं. यावेळी केलेल्या भाषणात प्रधानमंत्र्यांनी देशासमोरच्या समस्या आणि प्रगतीचा आढावा घेतला.

देशाला नव्या उंचीवर घेऊन जाण्यासाठी सप्तधारांच्या आधारे विकास करण्याचं आवाहन त्यांनी यावेळी केलं. कारखाने, कृषी आणि अन्न प्रक्रिया, तंत्रज्ञान आणि नवोन्मेष, गती शक्ती, संरक्षण उत्पादन, पर्यावरणानुकूल तसंच समुद्री साधनसंपत्तीवर आधारित अर्थव्यवस्था आणि सांस्कृतिक मूल्याचं जतन संवर्धन याकडे लक्ष देण्याचं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

**बाइट १**

गेल्या १२ वर्षात झालेल्या सुधारणांचा आढावा प्रधानमंत्र्यांनी घेतला. विकसित भारताला अनुरुप सर्व यंत्रणा असाव्या यासाठी सुधारणांचा वेग वाढवण्याचं आवाहन त्यांनी विविध राज्य सरकारं, स्थानिक स्वराज्य संस्था, उद्योग, समाज, शेतकरी आणि सामान्य नागरिकांना केलं. देशातले युवा, महिलांनी दिलेल्या योगदानाची आठवण त्यांनी यावेळी काढली. तसंच युवा वर्गाला मोफत ऑनलाईन कोचिंग देण्याची घोषणा केली.

**बाइट २**

आगामी राष्ट्रकूल स्पर्धा भारतात होणार असून २०३६ चं ऑलिम्पिक भारतात व्हावं यासाठी सरकारनं दावा केला आहे. ऑलिम्पिकमधल्या दोन तृतीयांश खेळांमध्ये भारताचं प्रतिनिधीत्वच नसतं यावरुन त्यांनी दुःख व्यक्त केलं आणि हे प्रतिनिधीत्व वाढवण्यासाठी विशेष अभियान चालवण्याची घोषणा केली.

**बाइट ३**

देशाला नक्षलवादातून मुक्त केल्यानंतर आता अराजकता माजवण्याचा प्रयत्न करणाऱ्यांपासून सावध राहण्याचा इशारा त्यांनी दिला.

**बाइट ४**

जागतिक पातळीवर युद्धाचं स्वरुप बदलत असल्यानं स्वयंसेवी होमगार्डचं एक दल तयार करण्याचं सुतोवाच त्यांनी यावेळी केली. त्यात नागरिकांना आधुनिक संकटांपासून संरक्षण करण्याचं प्रशिक्षण दिलं जाईल.

भाषणाच्या शेवटी त्यांनी नागरिकांना विकसित भारतासाठी एक दिलानं काम करण्याचंही आवाहन केलं.

<><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज ८० व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त नवी दिल्ली इथे राष्ट्रीय युद्ध स्मारकावर पुष्पचक्र वाहून देशासाठी बलिदान देणाऱ्या शूरवीरांना आदरांजली वाहिली.

<><><><><>

भाजपा अध्यक्ष नितीन नबीन यांच्या हस्ते आज नवी दिल्लीत भाजपा मुख्यालयात ध्वजारोहण झालं. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे यांच्या हस्ते पक्ष मुख्यालयात ध्वजारोहण करण्यात आलं. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांच्या हस्ते संघ मुख्यालयात ध्वजारोहण झालं.

<><><><><>

जागतिक नेते आणि आंतरराष्ट्रीय संघटनांनी भारताला स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. त्यात रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन, फ्रान्सचे अध्यक्ष ईमान्युएल मॅक्रॉन, ऑस्ट्रेलियाचे प्रधानमंत्री अँथोनी अल्बानिस, इस्राएलचे अध्यक्ष इसाक हेरझॉग, सिंगापूरचे अध्यक्ष थर्मन षण्मुगरत्नम, नेपाळचे प्रधानमंत्री बलेंद्र शाह, मालदीवचे अध्यक्ष मोहम्मद मुइझ्झू यांच्यासह अमेरिका, अर्जेंटिना, श्रीलंका, नेपाळ, मालदीव या देशांच्या उच्चायुक्तांनीही भारताला स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. या शुभेच्छांबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आभार मानले आहेत.

<><><><><>

भारताचा स्वातंत्र्यदिन वेगळ्या आणि प्रतिकात्मक पद्धतीनं साजरा करण्यासाठी आज 'सूर्यपथ तिरंगा' ही जागतिक साखळी मोहीम आयोजित करण्यात आली आहे. या उपक्रमांतर्गत, उगवत्या सूर्याचा मार्ग अनुसरत भारताचा राष्ट्रध्वज जगभर प्रवास करत आहे.  जगाच्या एका भागात पहाट होताच तिथं

राष्ट्रध्वज फडकवला जातो आणि त्यानंतर पश्चिमेकडच्या पुढच्या देशातल्या भारतीय दूतावासावर ध्वज फडकवला जातो. यामुळे विविध खंडांमधून तिरंग्याची एक अखंड साखळी तयार होते.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी स्वातंत्र्यदिनानिमित्त नागरिकांना ५ हजार रुपये देणार असून त्यासाठी त्यांच्या बँक खात्याची माहिती मागणारा संदेश सध्या समाजमाध्यमांवर फिरतो आहे . हा संदेश बनावट असून प्रधानमंत्र्यांनी अशी कोणतीही घोषणा केलेली नाही असं पत्र सूचना कार्यालयानं स्पष्ट केलं आहे.

<><><><>

इस्त्रायलने आज सकाळी दक्षिण लेबनॉनवर केलेल्या हवाई हल्ल्यांत ११ जण ठार तर १९ जण जखमी झाल्याचं लेबनॉनच्या आरोग्य मंत्रालयानं म्हटलं आहे. इस्त्रायली सैनिकांवर झालेल्या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून हा हल्ला केल्याचं इस्त्राएलच्या लष्कराने म्हटलं आहे. लेबनॉन आणि इस्त्राईलने २६ जून रोजी केलेल्या करारानंतरचा हा सर्वात घातक  हल्ला होता.

<><><><>

इंडोनेशियाच्या किनारपट्टीजवळ आज पहाटे सहा वाजण्याच्या सुमाराला ७ पूर्णांक ७ दशांश रिश्टर स्केल तीव्रतेचा भूकंपाचा धक्का बसून त्यात ४० जणांचा मृत्यू झाला. या धक्क्यानं अनेक इमारती कोसळल्या तसंच परिसरात मोठ्या प्रमाणावर घबराट पसरली.

<><><><>

अणुऊर्जा विभागानं ‘सस्टेनेबल हार्नेसिंग अँड ॲडव्हान्समेंट ऑफ न्यूक्लियर एनर्जी’ अर्थात शांती कायद्याच्या नियमावलीचा मसुदा जाहीर केला आहे. यानुसार, भारतात अणुऊर्जा प्रकल्प चालवणाऱ्या कंपन्यांसाठी आता विमा योजना किंवा वित्तीय ठेव राखणं कायदेशीररीत्या अनिवार्य असेल. प्रकल्पाच्या साठ्यातून सर्व

इंधन काढून टाकेपर्यंत ही आर्थिक सुरक्षा लागू राहणार आहे. जर एखादा अणुऊर्जा प्रकल्प किंवा अणुभट्टी परदेशी आराखड्यावर आधारित असेल, तर तो आराखडा संबंधित देशातील नियामक संस्थेकडून प्रमाणित केलेला असावा, अशी आणखी एक महत्त्वाची तरतूदही या नियमावलीत आहे.

<><><><>

नेदरलँड्समधे ॲमस्टेलवीन इथं सुरू असलेल्या पुरुषांच्या हॉकी विश्व चषक स्पर्धेतल्या पहिल्या सामन्यात भारतानं वेल्सचा ३ - १ नं पराभव केला. या सामन्यात कर्णधार हरमनप्रीत सिंगनं दोन गोल केले.
संजय राणानं ८ व्या मिनिटाला भारताला १-० अशी आघाडी मिळवून दिल्यानंतर, हरमनप्रीतनं ११ व्या आणि ४३ व्या मिनिटाला पेनल्टी कॉर्नरद्वारे गोल केले. वेल्ससाठी ५६ व्या मिनिटाला सॅम वेल्शनं एकमेव गोल केला.

<><><><>

भारतीय क्रिकेट संघाच्या श्रीलंका दौऱ्यात आज गॉल इथं सुरू झालेल्या पहिल्या कसोटी सामन्यात भारतानं प्रथम फलंदाजी करताना पहिल्या डावात दिवसअखेर २ बाद २८८ धावा केल्या. देवदत्त पडिक्कलचं नाबाद शतक, आणि त्यानं दुसऱ्या गड्यासाठी के एल राहुलसोबत केलेली १५० धावांची भागीदारी हे आजच्या दिवसाचं वैशिष्ट्य ठरलं. संघाच्या १९७ आणि वैयक्तिक ७७ धावा झाल्या असताना के एल राहुल जायबंदी झाल्यानं तंबूत परतला. त्यानंतर आलेला कर्णधार शुभमन गिल चांगली कामगिरी करु शकला नाही. तो १६ धावा काढून बाद झाला. आजचा खेळ थांबला तेव्हा देवदत्त पडिक्कल १३१, तर ऋषभ पंत २७ धावांवर खेळत होता.

भारताचा हा ६०० वा कसोटी क्रिकेट सामना आहे. ६०० चा आकडा गाठणारा, भारत हा जगातला तिसरा देश आहे. भारताचा पहिला कसोटी सामना

१९३२ साली इंग्लंडविरुद्ध झाला होता. आजवर भारतानं खेळलेल्या कसोटी सामन्यांमधले १८६, म्हणजे ३१ टक्के सामने जिंकले आहेत.

//<><><><><>//